**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 26-07-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-07-26 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-07-27 | 2024-07-28 | 2024-07-29 | 2024-07-30 | 2024-07-31 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 34.4 | 75.6 | 35.0 | 32.1 | 31.7 |
| कमाल तापमान (अं.से) | 28.8 | 26.4 | 27.6 | 29.0 | 29.8 |
| किमान तापमान (अं.से) | 23.5 | 22.6 | 23.6 | 23.7 | 23.9 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 90 | 91 | 88 | 87 | 86 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 73 | 83 | 72 | 70 | 67 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 22 | 20 | 18 | 18 | 16 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 272 | 253 | 247 | 263 | 270 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 7 | 7 | 8 | 8 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २७ ते ३१ जुलै २०२४ दरम्यान मुख्यतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक २७, ३०, व ३१ जुलै २०२४ रोजी बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक २९ जुलै २०२४ रोजी सर्वत्र ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक २८, २९, ३० व ३१ जुलै २०२४ रोजी तुरळक ठिकाणीमेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक ३१ जुलै ते ०६ ऑगस्ट २०२४ दरम्यान सरासरी पेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता तर कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• कपाशी, सोयाबीन, मुग, उडीद, तूर, संत्रा, मोसंबी, लिंबू व अन्य हंगामी, फळ पिके व भाजीपाला पिकामध्ये अतिरिक्त साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी सऱ्या फोडाव्या तसेचसध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर वाफसा परिस्थिती असताना आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी) कामे करावी. • पुढील ४ दिवस सार्वत्रिक स्वरूपाच्या पावसाची शक्यता लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे,कृषी रसायनांच्या फवारणीची कामे तसेच उभ्या पिकात खते देण्याची कामेपुढे ढकलावे. • शेतकरी, शेत मजूर यांनी नदी नाल्यावरून पाणी वाहत असल्यास रस्ता ओलांडतांना घाई करू नये तसेच आपली इतर जनावरे वाहत्या पाण्यातून जाणार नाही याची दक्षता घ्यावी. • तण व्यवस्थापनासाठी उगवण पश्चात तणनाशकांचा वापर हा जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना आणि शांत आणि स्वच्छ हवामान परिस्थिती असतांना करावा. विभिन्न तणनाशके एकमेकांमध्ये मिसळू नये, विभिन्न सक्रीय घटकांचा तण व्यवस्थापनासाठी सुरक्षित आणि कार्यक्षम तण व्यवस्थापनासाठी फक्त पूर्व-मिश्रित तणनाशकांचा वापर करावा. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतरपाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव वट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी.शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजीघ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा. • शेतकरी बांधवांनी कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव जाणण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे तसेच शिफारशीनुसार पिक वाढीच्या सुरुवातीच्या अवस्थेमध्ये नियंत्रणाच्या उपाययोजनाचा अवलंब करावा.

**संक्षिप्त संदेश सल्ला:**

| |
|---|
| • मागील झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता पिक क्षेत्रामध्ये साचलेल्या पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |

**पिक निहाय सल्ला:**

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • मागील आठवड्यात झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतात पाणी साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • ज्या ठिकाणी कपाशी पेरणी झाली आहे अशा ठिकाणी वाफसा आल्यानंतर ज्या ठिकाणी खांडे पडले असतील त्या ठिकाणी बियाणे पेरून खांडे भरून घ्यावेत. • पिक उगवणीनंतर तन व्यवस्थापनासाठी, रुंद पानाच्या तन नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम १० % ईसी १२.५ मिली ते १५ मिली प्रती लिटर पाणी किंवा गवतवर्गीय प्रकारच्या तन नियंत्रणासाठी क्विझालोफॉप इथाइल ५ % ईसी १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना फवारणी करावी. • पिक उगवणीनंतर रुंद व अरुंद पानाच्या तन व्यवस्थापनासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६ % ईसी + क्विझालोफॉप इथाइल ४ % ईसी २० ते २५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • डवरणी आणि खुरपनीची कामे शक्यतो सकाळच्या वेळी करावी. प्रभावी तन व्यवस्थापनासाठी तन २ ते ३ पानावर असताना तन नाशकाचा वापर करावा. |
| भात | • पावसाचा अंदाज लक्षात घेता धान पिकाचे रोपे / पर्हे २१ ते २५ दिवसांचे झाले असल्यास रोवणी करावी. • मित्र किडींच्या संवर्धनासाठी धान बांधावर झेंडू व चवळी पिकाची लागवड करावी. • रोपवाटीका:- खोडकिडा व गादमाशीच्या व्यवस्थापनाकरिता कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५ किलो ग्रॅम प्रति हेक्टर (कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५० ग्रॅम प्रति १०० वर्ग मीटर रोपवाटीका) रोपकाढणीच्या ५ दिवस अगोदर रोपवाटीकेत टाकावे. • धान रोपवाटीका तण विरहीत ठेवावी. • धान बांधावर झेंडूची सापळा पिक म्हणून लागवड करावी. • रोपांचे शेंडे तोडून बांबूच्या टोपलीत जमा करावी त्यामुळे रोपांच्या शेड्यांवर असणारी खोडकीडींची अंडी नष्ट होवून त्यामधून परोपजिवी किटकसुद्धा बाहेर पडतील. • गादमाशी प्रवण क्षेत्रामध्ये धानावरील गादमाशीचा प्रादुर्भाव कमी करण्याकरिता रोवणी २ ते २० जुलै दरम्यान करावी. • तुड्तुड्यांच्या व्यवस्थापनाकरिता रोपांची लावणी शिफारसीत अंतरावर (२० x १५ किंवा २० x २० सें.मी.), पट्टा पद्धतीने लागवड करावी (१० ओळी किंवा २ मीटर नंतर ३० सेमी. जागा मोकळी सोडावी). • रासायनिक खते:- जमिनीची तपासणी करुन योग्य प्रमाणात रासायनिक खताचा वापर केल्यास शेती किफायतशीर होते. सर्वसाधारणपणे १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) विभागून द्यावी. |
| सोयाबीन | • मागील आठवड्यात झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतात पाणी साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • सोयाबीन पिकासाठी शिफारशीतील उगवण पश्चात पूर्व मिश्रित (पेरणीनंतर १५ -२० दिवसांनी) असलेले तणनाशक: सोयाबीन पिकामध्ये पूर्व मिश्रित तन नाशकाद्वारे उगवण पश्चात तणांचे व्यवस्थापन खालीलपैकी कोणतेही एक तणनाशक जसे कि, फ्लुअझीफॉप-पी-ब्युटाइल + फोमेसाफेन एसएल @ १ लिटर प्रति हेक्टर प्रती ५०० लिटर पाणी किंवा इमाझीथापर ३५ + इमाझामॉक्स ३५ डब्ल्यूजी @ १०० ग्रॅम प्रति हेक्टर प्रती ३७५ ते ५०० लिटर पाणी किंवाप्रोपॅक्विझाफॉप २.५ % + इमॅझेथापियर ३.७५ % एमई @ २.० लिटर प्रति हेक्टर प्रती 500 लिटर पाणी किंवासोडियम एसफ्लोरोफेन १६.५ + क्लोडिनाफॉप प्रोपार्गिल १८ ईसी @ १.० लिटर प्रति हेक्टर प्रती ५०० लिटर पाणी किंवाफोमेसाफेन १२ + क्विझालॉफॉप इथाइल ३ % एससी @ १.५ लिटर प्रति हेक्टर प्रती ५०० लिटर पाणी किंवाक्विझालोफॉप इथाइल १० % ईसी+ क्लोरीमुरॉन इथाइल २५ % डब्ल्यूपी + सर्फॅक्टंट (०.२ %) (हर्बिसाइड) (ट्विन पॅक) @ ३७५ मिली + ३६ ग्रॅम + ०.२ % प्रति हेक्टर प्रती ३०० लिटर पाणी या प्रमाणात तणांचा प्रकार लक्षात घेऊन जमिनीत पुरेसा ओलावा सूर्यप्रकाश असतानाच वापरावे. • लेबल क्लेम शिफारस काळजीपूर्वक वाचून घ्यावी तसेच त्यातील सूचनांचे काळजीपूर्वक पालन करावे. |
| तूर | • मागील आठवड्यात झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतात पाणी साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| मका | • मागील आठवड्यात झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतात पाणी साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • मागील आठवड्यात झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतात पाणी साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री आणि वाफसा आल्यानंतर भरून ठेवलेल्या खड्ड्यांमध्ये संत्र वर्गीय फळझाडांच्या कलमांची लागवड करावी. कलमा लावतांना कलमांचा डोळा १५ ते २० सेंमी उंचीवर असावा. कलमा लावण्यापूर्वी मुळांना मेफेनोक्झाम एम झेड-६८ २.५ ग्राम आणि कार्बेन्डाझीम ५० % डब्ल्यूपी १ ग्राम प्रती १ लिटर पाणी या प्रमाण द्रावण तयार करून बुडवून नंतर लावावीत. • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. झाडावरील पानसोट काढून टाकावेत. दोन ओळीमधील मोकळ्या जागेत उडीद, मुग, सोयाबीन, भुईमुग इत्यादी पिकाची आंतरपीक म्हणून लागवड करावी. हिरवळीच्या खताच्या उपलब्धतेसाठी धेंचा किंवा ताग ४० किलो प्रती हेक्टर बियाणे या प्रमाणात पेरणी करावी. • नवीन नवतीवर सिट्रस सिला, मावा आणि नाग अळीचा प्रादुर्भाव सामान्यपणे दिसून येतो. या किडींच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट# ३० ईसी @ २० मिली किंवा थायमेथोक्झाम# २५ डब्ल्यूजी @ ३.० ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड# १७.८ एसएल @ ५.० मिली तसेच कोळी किडीच्या व्यवस्थापनासाठी डायफेनथीयुरोन# ५० डब्ल्यूपी @ २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून नवतीच्या काळात स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास वरीलपैकी कोणत्याही किटक नाशकाची १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. |
| मिरची | • मागील आठवड्यात झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतात पाणी साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • मिरची च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मिरचीच्या रोपांची लागवड करण्यापूर्वी रोपांचे शेंडे डायमेथोएट ३० ईसी १० मि. ली + पाण्यात मिसळणारे गंधक (८० %) ३ ग्रॅम + मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी २.५ ग्रॅम एक लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लावावे. |
| वांगे | • वांग्याच्या च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मागील आठवड्यात झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतात पाणी साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| टोमॅटो | • टोमाटो च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मागील आठवड्यात झालेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतात पाणी साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • पाऊसव विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • जनावरे पावसात फार काळ भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | • पक्षांना सकस आहार तसेच स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • तननाशकाची खरेदी आणि फवारणी करताना लेबल नीट वाचून घ्यावे. ढगाळ हवामान व पाऊस असताना तननाशकाची फवारणी करू नये. वारा नसताना व जमिनीत पुरेसा ओलावा असताना उगवण पूर्व तन नाशकाची फवारणी करावी. फवारणीकरिता स्वच्छ पाणी वापरावे तसेच कडक उन्हात उगवण पश्चात फवारणी टाळावी. तन नाशकाचा वापर काळजीपूर्वक करावा. फवारणी पूर्वी फवारणी पंप स्वच्छ धुवून घ्यावा. ढगाळ हवामान असतांना फवारणी करू नये. शिफारशीत नसलेली भिन्न तननाशके एक मेकांत मिसळू नये. तननाशकाची फवारणी पूर्वी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री करावी. |